नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २१६ Issue - 216 | वार सोमवार दि. २३ डिसेंबर २०२४ Blow- Monday Date 23 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## महायुतीमध्ये पालकमंत्रीपदांवरून रस्सीखेच

### राजकीय सारीपाट : मंत्रिमंडळ खातेवाटपानंतर आता नवा पेच



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व ठेवण्यासाठी पालकमंत्रीपद महत्त्वाचे ठरते. विशेषत: जिल्हा नियोजन समितीकडील निधीचे वाटप पालकमंत्र्यांच्या अधिकारात होते. तसेच प्रशासकीय व पोलीस यंत्रणाही हाताखाली राहते. त्यासाठीच प्रत्येक मंत्र्याला आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळावे, अशी अपेक्षा असते. त्यामुळेच खातेवाटप जाहीर होताच आता पालकमंत्री होण्यासाठी चढाओढ बघायला मिळत आहे. रायगडचे पालकमंत्रीपद आपल्यालाच मिळाले पाहिजे, अशी अपेक्षा शिवसेनेचे भरत गोगावले यांनी उघडपणे व्यक्त केली. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना गोगावले यांना झुकते माप मिळत असे. विशेषत: बदलत्या राजकीय समीकरणांत भाजप आणि अजित पवार गट अधिक जवळ आल्याने राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे आपल्या मुलीसाठी म्हणजे आदिती तटकरे यांच्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावण्याची चिन्हे आहेत. रायगडच्या पालकमंत्रीपदावरून शिवसेना आणि राष्ट्रवादीत उघडउघड आरोप-प्रत्यारोप होण्याची चिन्हे आहेत. निकालानंतर सुमारे महिनाभरानंतर अखेर मंत्रिमंडळ खातेवाटप झाल्यानंतर आता महायुतीमध्ये पालकमंत्रीपदांवरून रस्सीखेच सुरू झाली आहे. तिन्ही पक्षांचे अनेक ज्येष्ठ नेते एकेका जिल्ह्यातून मंत्री झाल्यामुळे त्यांनी पालकमंत्रीपदावर दावे ठोकायला सुरुवात केली आहे. त्याच वेळी आता मंत्रालयातील दालनांवरूनही रुसवेफुगवे होऊ लागले आहेत. छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्रीपदावर शिवसेनेचे संजय शिरसाट यांनी दावा ठोकला. भाजपचे अतुल सावे यांचाही पालकमंत्रीपदावर डोळा आहे. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडेच कायम राहील, अशी चिन्हे आहेत. मात्र भाजपचे ज्येष्ठ मंत्री चंद्रकांत पाटील यांनाही पालकमंत्रीपद मिळावे, असे वाटते. अजित पवार हे महायुतीत सहभागी होण्यापूर्वी चंद्रकांतदादाच पालकमंत्री होते. पुण्यासारख्या महत्त्वाच्या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भाजपकडे राहावे, अशी त्यांची भूमिका असल्याचे समजते. ठाणे जिल्ह्यावर आपले वर्चस्व कायम राहावे हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा प्रयत्न राहणार आहे. मात्र जास्त आमदार असल्यामुळे गणेश नाईक यांच्यासाठी भाजपही ठाण्यावर दावा सांगत आहे. नाईक पूर्वीही पालकमंत्रीपद राहिले आहेत. शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद शिवसेनेकडेच राहील, असे जाहीर करून टाकले आहे. सातारा जिल्ह्यातील सर्वाधिक चार आमदार मंत्रिमंडळात आहेत. शंभूराज देसाई यांना पालकमंत्रीपद कायम राहावे, असे वाटते. भाजपचे शिवेंद्रनराजे भोसले यांनाही पालकमंत्रीपदाचे वेध लागले आहेत. नाशिकचे पालकमंत्रीपद भाजपकडे कायम राहावे, असा पक्षाचा प्रयत्न असेल. त्यासाठी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचे कारण पुढे करण्यात येत आहे. राष्ट्रवादीचे माणिकराव कोकाटे यांनीही पालकमंत्रीपदावर दावा केला आहे. गेल्या मंत्रिमंडळात गृहनिर्माण खाते भाजपकडे होते. आता ते एकनाथ शिंदे यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. अल्पसंख्याक व औकाफ ही खाते शिंदेंकडे होती. नव्याने राष्ट्रवादीचे दत्ता भरणे यांच्याकडे हे खाते गेले आहे. भाजपकडील पर्यटन हे खाते शिवसेनेच्या वाट्याला आले आहे. शिवसेनेकडे असलेले पणन हे खाते आता भाजपला मिळाले आहे. यानुसारच काही जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद बदलले जातील, असे सांगण्यात येत आहे. पूर्वी प्रत्येक विभागाची कार्यालये असलेल्या मजल्यावरच मंत्र्याचे दालन असायचे. पुढे मंत्र्यांची ज्येष्ठता व हेवेदावे यातून ही प्रथा मोडली. आपले दालन सहाव्या मजल्यावर असावे, अशी अनेकांची इच्छा असते. शिंदे सरकारमध्ये ३० मंत्री असताना काही जणांनी शेजारील कार्यालयांची जागा गिळंकृत करून आपली दालने मोठी केली. मात्र आता ४२ मंत्री आहेत. त्यात मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्र्यांना सहाव्या मजल्यावर जागा करून द्यावी लागेल. अन्य ३९ मंत्री व राज्यमंत्र्यांसाठी दालने उपलब्ध होणे कठीण होणार आहे. यापूर्वी जम्बो मंत्रिमंडळ असताना काही राज्यमंत्र्यांना विधान भवनात दालने थाटावी लागली होती. यावेळी ३३ कॅबिनेट मंत्र्यांना चांगल्या दालनाची अपेक्षा असल्याने वाद होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांना हस्तक्षेप करावा लागू शकतो.

सध्याच्या मंत्रिमंडळात १६ जिल्ह्यांना प्रतिनिधित्व मिळालेले नाही. त्यामुळे एकापेक्षा अधिक मंत्रीपदे असलेल्या जिल्ह्यातील नेत्यांना बाहेरच्या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भूषवावे लागेल. मंत्रिमंडळात दोन उपमुख्यमंत्र्यांसह ३५ कॅबिनेट मंत्री असल्याने राज्यमंत्र्यांनाही फार संधी मिळणे कठीण आहे.

## पंतप्रधान मोदींना मिळाला कुवेतचा सर्वोच्च नागरी सन्मान



कुवेत सिटी: भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या कुवेत दौऱ्यावर आहेत. चार दशकांतील भारतीय पंतप्रधानांची ही पहिलीच कुवेत भेट आहे. यादरम्यान,कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल सबा यांच्याकडून नरेंद्र मोदी यांना रविवारी 'द ऑर्डर ऑफ मुबारक द ग्रेट' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.भारताचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांना हा २० वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे रविवारी कुवेतच्या 'बायान पॅलेस' येथे औपचारिक स्वागत करण्यात आले आणि त्यांना 'गार्ड ऑफ ऑनर' देण्यात आला. कुवेतचे अमीर शेख मेशाल अल-अहमद अल-जाबेर अल-सबाह यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान मोदी कुवेतला पोहोचले आहेत. गेल्या ४३ वर्षात भारतीय पंतप्रधानांची या आखाती देशाला झालेली ही पहिलीच भेट आहे. यावेळी, कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल सबाही उपस्थित होते. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'द ऑर्डर ऑफ मुबारक द ग्रेट' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला आहे. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल सबा यांच्याशी विस्तृत चर्चा केली. या चर्चेत भारत-कुवेत संबंधांना नवीन गती देण्यावर भर देण्यात आला आहे. विशेषत: व्यापार, गुंतवणूक आणि ऊर्जा क्षेत्रात परस्पर गुंतवणूक आणि व्यापारावर चर्चा झाली. दरम्यान, पंतप्रधान मोदींनी शनिवारी एका भारतीय समुदायाच्या कार्यक्रमाला संबोधित केले आणि एका भारतीय कामगार शिबिरालाही भेट दिली आहे.

भारत आणि कुवेतमध्ये शतकानुशतके जुने संबंध आहेत, सागरी व्यापार त्यांच्या ऐतिहासिक संबंधांचा कणा आहे. भारत हा कुवेतच्या प्रमुख व्यापार भागीदारांपैकी एक आहे आणि भारतीय समुदाय हा कुवेतमधील सर्वात मोठा प्रवासी समुदाय आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार १०.४७ अरब अमेरिकी डॉलर इतका होता. कुवेत हा भारताचा सहावा सर्वात मोठा कच्च्या तेलाचा पुरवठादार आहे, जो देशाच्या तीन टक्के ऊर्जा गरजा पूर्ण करतो.

## भीषण अपघातात एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

बंगळुरू : देशभरात दररोज अपघाताच्या अनेक घटना घडताना पाहायला मिळातात. आता बंगळुरुमधील नेलमंगळा तालुक्यातील बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात झाल्याची घटना शनिवारी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान घडली. या अपघातात एकाच कुटुंबातील ६ जणांचा मृत्यू झाला आहे. मृत कुटुंब हे सांगलीच्या जत तालुक्यातील मोरबगी गावचे होते अशी माहिती सांगितली जाते. एकाच कुटुंबातील ६ जणांचा मृत्यू झाल्यामुळे मोरबगी गावावर शोककळा पसरली आहे.

हे कुटुंब ख्रिसमसच्या सुट्टी निमित्ताने बेंगळुरूवरून जतकडे आपल्या गावी जात होते. मात्र, गावाकडे जात असताना एक कंटेनर त्यांच्या चारचाकी गाडीवर अचानक पलटी झाल्यामुळे एका आयटी इंजिनिअरसह ६ जणांचा दुर्देवी मृत्यू झाला. यामध्ये चंद्रम इप्पाळगोळ, त्यांची पत्नी गौराबाई (४० वर्षे), त्यांची मुले ज्ञान (१६ वर्षे) आणि दीक्षा (१० वर्षे), त्यांची मेहुणी विजयालक्ष्मी (३५ वर्षे) आणि त्यांची भाची आर्या (६ वर्षे) अशी मृतांची नावे आहेत. चंद्रम इप्पाळगोळ हे मूळ सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील मोरबागी गावाचे रहिवासी होते. चंद्रम इप्पाळगोळ हे बंगळुरू येथे एका सॉफ्टवेअर कंपनीत सीईओ होते. त्यांचे कुटुंब देखील त्यांच्याबरोबर बेंगळुरू येथे राहत होते. बेंगळुरू ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रम इप्पाळगोळ आणि त्याचे कुटुंब कर्नाटकच्या विजयपुरा जिल्ह्याच्या सीमेला लागून असलेल्या महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील मोरबागी येथील त्यांच्या गावी जात होते. ते त्यांच्या आजारी वडिलांना भेटायला आणि ख्रिसमस सुट्टीनिमित्त जात होते. मात्र, एक भरधाव कंटेनर ट्रक त्याच्या गाडीवर येऊन पलटी झाला. चंद्रम इप्पाळगोळ यांनी दोन महिन्यांपूर्वीच चारचाकी गाडी खरेदी केली होती. माहितीनुसार, समोरून येणाऱ्या दुसऱ्या एका वाहनाला वाचवण्याच्या प्रयत्नात चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले आणि भरधाव वेगात जात या ट्रकने विरुद्ध दिशेने येणाऱ्या कारला धडक दिली. यामध्ये त्या कारमधील ६ जणांचा मृत्यू झाला. दरम्यान, या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करत अधिक तपास सुरु केला आहे. तसेच ट्रकच्या चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ट्रकचा चालकही गंभीर जखमी झाला असून त्याच्यावरही रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती सांगण्यात आली आहे.

## बिहार विधानसभा निवडणूक नितीशकुमार व मोदींच्या नेतृत्वातच; सम्राट चौधरी

नवी दिल्ली : पुढील वर्षी बिहार विधानसभेची होत असलेली निवडणूक मुख्यमंत्री नितीशकुमार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात रालोआ लढविणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते सम्राट चौधरी यांनी दिली. ते भाजप मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेला संबोधित करीत होते.

दरम्यान, निवडणुकीत नितीशकुमार यांना नेतेपदी नियुक्ती करण्याबाबत रालोआ पुनर्विचार करू शकतो का या प्रश्नाला उत्तर देताना यात कोणतेही दुमत नसल्याचे चौधरी म्हणाले. २४३ सदस्यसंख्या असलेल्या बिहार विधानसभेची निवडणूक २०२५ च्या अखेरीस होणार आहे.

भाजपचे माजी अध्यक्ष आणि पक्षाचे प्रमुख रणनीतीकार असलेले विद्यामान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काही दिवसांपूर्वी एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बिहार विधानसभा निवडणुकीबाबत केलेल्या भाष्यामुळे चलबिचल वाढली होती.

## जीएसटी परिषदेची बैठक संपन्न!




नवी दिल्ली : राजस्थानच्या जैसलमेर येथे जीएसटी (वस्तू व सेवा कर) परिषदेची ५५ वी बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत पॉपकॉर्नवर कर लावण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. परिषदेने पॉपकॉर्नच्या फ्लेवरनुसार (चवीनुसार) त्यावर कर आकारण्याचा निर्णय घेतला आहे. याचाच अर्थ वेगवेगळ्या फ्लेवरच्या पॉपकॉर्नवर वेगवेगळा जीएसटी आकारला जाईल. जीएसटी परिषदेच्या या बैठकीवेळी आरोग्य व जीवन विमा हप्त्यावरील वस्तू आणि सेवा करात सूट अथवा त्यात कपात करण्याचा निर्णय घेतला जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, जीएसटी परिषदेने हा निर्णय लांबणीवर टाकला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीत या संबंधाने नियुक्त मंत्रिगटाला कोणताही निर्णय घेण्यासाठी आणखी वेळ हवा असल्याचं सांगण्यात आलं आहे. मंत्रिगटाने १४८ वस्तूंवरील करामध्ये दरबदल करण्याची शिफारस केली आहे.

देशात सध्या, जीवन व आरोग्य विम्यावर भरलेल्या हप्त्यावर १८ टक्के दराने जीएसटी आकारला जातो. मंत्रिगटापुढे, यात सूट देण्यासह, ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य विमा व मुदतीच्या जीवन विम्यावरील करात सूट देण्याची तसेच ५ लाख रुपयांच्या आरोग्य विम्याच्य संरक्षणावरील ५ टक्के कर दर कमी करण्याबाबत शिफारस देण्यास सांगण्यात आले होते.

दरम्यान, जीएसटी परिषदेच्या या बैठकीनंतर कोणकोणत्या वस्तू व सेवा स्वस्त झाल्या असा प्रश्न सर्वांना पडला आहे. तसेच कोणत्या वस्तू व सेवा महागणार असल्याचं लोकांना जाणून घ्यायचं आहे. याची माहिती आम्ही तुम्हाला देत आहोत.

काय स्वस्त होणार?

फॉर्टिफाइड राइस केर्नल्स म्हणजेच एमआरके स्वस्त होईल. यावरील जीएसटी ५ टक्क्यांनी कमी करण्यात आला आहे.

जीन थेरपी पूर्णपणे जीएसटी कक्षेच्या बाहेर ठेवण्यात आली आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सरकारी कार्यक्रमांतर्गत पुरवल्या जाणाऱ्या खाद्यसामग्रीवर आता केवळ ५ टक्के जीएसटी आकारला जाईल.

हवाई क्षेपणास्त्र असेम्ब्लिंग प्रणाली

आयएईए तपासणी उपकरणे स्वस्त होतील. आंतराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीद्वारे तपासणीसाठी वापरली जाणारी उपकरणे.

काळी मिरी व बेदाणे (शेतकऱ्यांकडून पुरवठा) : थेट शेतकरी विकत असलेल्या काळी मिरी व बेदाण्यांवर जीएसटी आकारला जाणार नाही.

काय महागणार?

जुनी, सेकेंड हँड वाहनं महाग होतील. यावर पूर्वी १२ टक्के जीएसटी आकारला जात होता. आता १८ टक्के जीएसटी भरावा लागेल.

रेडी टू ईट पॉपकॉर्न : मीठ व मसाल्यांचा वापर करून तयार केलेले पॉपकॉर्न जे पॅक केलेलं नसेल आणि ज्यावर लेबल नसेल त्यावर ५ टक्के जीएसटी आकारला जाईल. दुसऱ्या बाजूला मीठ व मसाला वापरून तयार केलेले तेच पॉपकॉर्न पॅक केले व त्यावर लेबल लावलं असेल (पॅकेज्ड फ्लेवर्ड पॉपकॉर्न) तर त्यावर १२ टक्के जीएसटी आकारला जाईल. साखर व फ्लेवर वापरलेले पॉपकॉर्न आणखी महाग होणार आहे. कॅरमेलसारख्या साखरेपासून तयार केलेले पॉपकॉर्न शुगर कन्फेक्शनरी श्रेणीत ठेवण्यात आले असून त्यावर १८ टक्के जीएसटी आकारला जाईल. एसीसी ब्लॉक्सवर १२ टक्के जीएसटी आकारला जाणार आहे. कॉरपोरेट्सद्वारे पुरवल्या जाणाऱ्या सेवा महागणार आहेत.

### आदित्य आणि अमितही पोहचले

### राजकीय चर्चांना उधाण

## राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र !

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे दोघंही आज एकत्र आल्याचं पाहण्यास मिळालं. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतील का? या चर्चा कायमच सुरु असतात. राज ठाकरे यांनी शिवसेना सोडून नवा पक्ष स्थापन केल्यापासून या चर्चांना सुरुवात झाली आहे. दरम्यान २०१९ मध्ये जेव्हा विधानसभा निवडणूक आली होती तेव्हा राज ठाकरे हे महाविकास आघाडीबरोबर होते. मात्र २०२२ नंतर राज ठाकरे महायुतीबरोबर गेले. आता आज एका कार्यक्रमाच्या निमित्ताने ठाकरे बंधू एकत्र आल्याचं पाहण्यास मिळालं.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही नेते एका लग्नाच्या निमित्ताने एकत्र आलेले दिसले. या दोघांमध्ये चर्चाही झाली. ती काय होती त्याचा तपशील समजू शकलेला नाही. मात्र आता हे दोन नेते एकत्र आल्याने महापालिका निवडणुकीच्या आधी काही सूत्रं बदलतील का या चर्चांना मुंबईतल्या राजकीय वर्तुळात हे दोन बंधू आणि राजकीय नेते एकत्र येतील अशा चर्चा सुरु झाल्या आहेत. मुंबईतल्या दादर या ठिकाणी असलेल्या राजे शिवाजी महाविद्यालयात लग्नाचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यासाठी हे दोन्ही नेते सहकुटुंब पोहचल्याचं पाहण्यास मिळालं.



राज ठाकरे यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात शिवसेनेपासूनच केली होती. मात्र त्यांनी पक्ष सोडला आणि महाराष्ट्र नवनिर्माण पक्ष स्थापन केला. बाळासाहेब ठाकरे हयात असतानाच राज ठाकरे वेगळे झाले होते. तसंच उद्धव ठाकरे हे सुरुवातीला राजकारणात सक्रिय नव्हते. जेव्हा उद्धव ठाकरे राजकारणात सक्रिय झाले तेव्हा राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे अशी दोन सत्ताकेंद्रं शिवसेनेत नंतर निर्माण होऊ लागली होती. बाळासाहेब ठाकरे यांनी कुणालाही राजकीय वारस असं जाहीर केलं नाही. मात्र राज ठाकरे यांची घुसमट वाढू लागली आणि त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष स्थापन केला आणि मराठीचा मुद्दा उचलून धरला होता. २०१४ मध्ये त्यांनी मोदींना पाठिंबा दिला. २०१९ मध्ये महाविकास आघाडीला तर २०२४ मध्ये महायुतीला पाठिंबा दिला. त्यांच्या या बदलत्या भूमिकेमुळे त्यांचं राजकारण काहीसं अस्थिर राहिलं. मात्र काका बाळासाहेब ठाकरेंना आपला विठ्ठल मानून त्यांनी राजकारण केलं. या विधानसभा निवडणुकीत त्यांना अपयश आलं. आता महापालिका निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने या भेटीकडे पाहिलं जातं आहे.

उद्धव ठाकरेंनी २०१९ पर्यंत संयत म्हणता येईल असंच राजकारण केलं. बाळासाहेब ठाकरेंसारखा आक्रमक बाणा, स्पष्टवक्तेपणा दिसला नाही. मात्र त्यांनी पक्ष बराच वाढवला. २०१९ मध्ये मुख्यमंत्रिपदावरुन भाजपाशी वाद झाल्यानंतर त्यांनी युतीची साथ सोडली. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासह हातमिळवणी करुन उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. उद्धव ठाकरे अडीच वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. मात्र त्यांच्या काही चुकीच्या धोरणांबाबत न पटल्याने २०२२ ला शिवसेनेत बंड झालं. एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासह इतर अनेक आमदारांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडली. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे २० आमदार निवडून आले आहेत. तर दुसरीकडे महायुतीला प्रचंड बहुमत मिळालं आहे. उद्धव ठाकरेंनीही आता महापालिका निवडणुकीवर लक्ष केंद्रीत केलं आहे. या अनुषंगाने राज आणि उद्धव ठाकरे यांच्यातली भेट सूचक मानली जाते आहे. त्यामुळे आगामी काळात हे दोन नेते एकत्र येतील का? या चर्चा आता रंगल्या आहेत.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### सर्व काही वर्चस्वासाठी

जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व ठेवण्यासाठी पालकमंत्रीपद महत्त्वाचे ठरते. विशेषत: जिल्हा नियोजन समितीकडील निधीचे वाटप पालकमंत्र्यांच्या अधिकारात होते. तसेच प्रशासकीय व पोलीस यंत्रणाही हाताखाली राहते. त्यासाठीच प्रत्येक मंत्र्याला आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळावे, अशी अपेक्षा असते. त्यामुळेच खातेवाटप जाहीर होताच आता पालकमंत्री होण्यासाठी चढाओढ बघायला मिळत आहे. रायगडचे पालकमंत्रीपद आपल्यालाच मिळाले पाहिजे, अशी अपेक्षा शिवसेनेचे भरत गोगावले यांनी उघडपणे व्यक्त केली. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना गोगावले यांना झुकते माप मिळत असे. विशेषत: बदलत्या राजकीय समीकरणांत भाजप आणि अजित पवार गट अधिक जवळ आल्याने राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे आपल्या मुलीसाठी म्हणजे आदिती तटकरे यांच्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावण्याची चिन्हे आहेत. रायगडच्या पालकमंत्रीपदावरून शिवसेना आणि राष्ट्रवादीत उघडउघड आरोप-प्रत्यारोप होण्याची चिन्हे आहेत. निकालानंतर सुमारे महिनाभरानंतर अखेर मंत्रिमंडळ खातेवाटप झाल्यानंतर आता महायुतीमध्ये पालकमंत्रीपदांवरून रस्सीखेच सुरू झाली आहे. तिन्ही पक्षांचे अनेक ज्येष्ठ नेते एकेका जिल्ह्यातून मंत्री झाल्यामुळे त्यांनी पालकमंत्रीपदावर दावे ठोकायला सुरुवात केली आहे. त्याच वेळी आता मंत्रालयातील दालनांवरूनही रुसवेफुगवे होऊ लागले आहेत. सध्याच्या मंत्रिमंडळात १६ जिल्ह्यांना प्रतिनिधित्व मिळालेले नाही. त्यामुळे एकापेक्षा अधिक मंत्रीपदे असलेल्या जिल्ह्यातील नेत्यांना बाहेरच्या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भूषवावे लागेल. मंत्रिमंडळात दोन उपमुख्यमंत्र्यांसह ३५ कॅबिनेट मंत्री असल्याने राज्यमंत्र्यांनाही फार संधी मिळणे कठीण आहे. आता ४२ मंत्री आहेत. त्यात मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्र्यांना सहाव्या मजल्यावर जागा करून द्यावी लागेल. अन्य ३९ मंत्री व राज्यमंत्र्यांसाठी दालने उपलब्ध होणे कठीण होणार आहे. यापूर्वी जम्बो मंत्रिमंडळ असताना काही राज्यमंत्र्यांना विधान भवनात दालने थाटावी लागली होती. यावेळी ३३ कॅबिनेट मंत्र्यांना चांगल्या दालनाची अपेक्षा असल्याने वाद होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांना हस्तक्षेप करावा लागू शकतो.

# शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे !!



राष्ट्रीय शेतकरी दिवस हा हिंदीमध्ये 'किसान दिवस' म्हणूनही ओळखला जातो. हा दिवस भारताचे पाचवे पंतप्रधान श्री चौधरी चरणसिंग यांच्या जयंती स्मरणार्थ देखील साजरा केला जातो. 'शेतकरी दिन' हा शेतकरी आणि शेती यांच्या राष्ट्रीय योगदानाचा उत्सव साजरा करण्यासाठी विविध देशांमध्ये वार्षिक साजरा केला जातो. हे जगभरात वेगवेगळ्या तारखांना पाळले जाते. पहिला शेतकरी दिन २००१ मध्ये साजरा करण्यात आला. त्यावेळी दहाव्या सरकारने चौधरी चरणसिंग यांचे कृषी क्षेत्रातील योगदान आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी त्यांची जयंती 'किसान दिवस' म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून भारतातील दरवर्षी २३ डिसेंबर रोजी हा दिवस 'राष्ट्रीय शेतकरी दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी विविध कार्यक्रम, वादविवाद, परिसंवाद, प्रश्नमंजुषा स्पर्धा, चर्चा, कार्यशाळा, प्रदर्शने, निबंध लेखन स्पर्धा आणि कार्ये आयोजित करून तो साजरा केला जातो.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई–मेल: pravinbagde@gmail.com

चरणसिंह यांचा जन्म १९०२ मध्ये उत्तर प्रदेशातील मेरठ जिल्ह्यातील नूरपूर येथे एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात झाला. त्यांनी आग्रा विद्यापीठातून १९२३ मध्ये विज्ञान विषयात पदवी आणि १९२५ मध्ये पदव्युत्तर पदवी मिळवली. कायद्याचे प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांनी गाझियाबादमध्ये कायद्याचा सराव सुरू केला आणि १९२९ मध्ये ते मेरठला गेले. ते पहिल्यांदा १९३७ मध्ये छपरौली येथून यूपी विधानसभेवर निवडून आले आणि १९४६, १९५२, १९६२ आणि १९६७ मध्ये त्यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. १९४६ मध्ये पंडित गोविंद बल्लभ पंत यांच्या सरकारमध्ये ते संसदीय सचिव झाले आणि महसूल, वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य, न्याय, माहिती इत्यादी विविध खात्यांमध्ये त्यांनी काम केले. जून १९५१ मध्ये त्यांची राज्यात कॅबिनेट मंत्री म्हणून निवड करण्यात आली आणि त्यांच्याकडे न्याय आणि माहिती खात्यांचा कार्यभार देण्यात आला. पुढे त्यांनी १९५२ मध्ये डॉ. संपूर्णानंद यांच्या मंत्रिमंडळात महसूल आणि कृषी मंत्रीपद भूषवले. एप्रिल १९५९ मध्ये त्यांनी राजीनामा दिला तेव्हा ते महसूल आणि परिवहन खात्याची जबाबदारी सांभाळत होते. १९६० मध्ये श्री सी.बी. गुप्ता यांच्या मंत्रालयात ते गृह आणि कृषी मंत्री होते. १९६२–६३ मध्ये चरणसिंग यांनी श्रीमती सुचेता कृपलानी यांच्या मंत्रालयात कृषी आणि वनमंत्री म्हणून काम केले. त्या दशकात पंजाब आणि हरियाणामध्ये विकसित झालेल्या हरितक्रांतीने देशाचे कृषी चित्र बदलले. यामुळे उत्पादकता वाढली आणि त्यामुळे भारत विविध कृषी मालामध्ये स्वयंपूर्ण झाला.१९६५ मध्ये त्यांनी कृषी विभाग सोडला आणि १९६६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा पदभार स्वीकारला. चौधरी चरणसिंह यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्रीपद भूषवलं होतं. यादरम्यान त्यांनी अनेक महत्त्वाची कामं केली. त्यांच्यामुळेच आज शेतकरी खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला. त्यांनी जमीनदारी रद्द केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी लेखापद पद बनवलं. त्यानंतर ते उपपंतप्रधान बनले आणि मग २८ जुलै १९७९ ते १४ जानेवारी १९८० पर्यंत त्यांनी अत्यंत अल्प कालावधीसाठी पंतप्रधानपदी विराजमान होऊन पंतप्रधान म्हणून देशाची सेवा केली.

चरणसिंह यांनी उत्तर प्रदेशमध्ये विविध पदांवर काम केले आणि प्रशासनातील अकार्यक्षमता, घराणेशाही आणि भ्रष्टाचार सहन न करणारे कठोर कार्यकारी म्हणून नाव कमावले. एक हुशार संसदपटू आणि व्यावहारिक माणूस चरणसिंग हे त्यांच्या वक्तृत्व आणि विश्वासासाठी ओळखले जातात. ते उत्तर प्रदेशातील जमीन सुधारणांचे मुख्य शिल्पकार होते; ग्रामीण कर्जदारांना मोठा दिलासा देणारे विभाग विमोचन विधेयक १९३९ तयार करण्यात आणि अंतिम करण्यात त्यांनी प्रमुख भूमिका बजावली. मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी जमीनधारणा कायदा १९६० आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याचा उद्देश जमीनधारणेची कमाल मर्यादा कमी करणे आणि राज्यभर एकसमान करणे हे होते. एक समर्पित सार्वजनिक कार्यकर्ते आणि सामाजिक न्यायावर दृढ विश्वास ठेवणारे चरणसिंग यांचे सामर्थ्य मुळात लाखो शेतकऱ्यांच्या विश्वासातून निर्माण झाले. भारत हा मुख्यत: खेड्यांचा देश आहे आणि खेड्यांमध्ये राहणारी बहुसंख्य लोकसंख्या शेतकरी आहे आणि शेती हा त्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. अजूनही ७०% भारतीय लोकसंख्या शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून आहे.

चौधरी चरणसिंह यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध धोरणांनी भारतातील सर्व शेतकऱ्यांना जमीनदार आणि धनदांडग्यांच्या विरोधात एकत्र केले. भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेल्या 'जय जवान जय किसान' या प्रसिद्ध घोषणेचे त्यांनी पालन केले. ते एक अतिशय यशस्वी लेखक होते आणि त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली ज्यात शेतकरी आणि त्यांच्या समस्यांबद्दल त्यांचे विचार मांडले गेले. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी विविध उपायांच्या स्वरूपात खूप प्रयत्न केले. त्यांनी साधे जीवन व्यतीत केले आणि आपला मोकळा वेळ वाचन आणि लेखनात घालवला. त्यांनी 'जमीनदारीचे निर्मूलन', 'सहकारी शेतीचा क्ष–किरण', 'भारताची गरिबी आणि त्याचे निराकरण', 'शेतकऱ्यांची मालकी किंवा मजुरांसाठी जमीन' आणि 'खालील जमीन ताब्यात घेणे' यासह 'एक निश्चित किमान खाली विभाजनास प्रतिबंध' असे अनेक पुस्तके लिहिल्या. शेतकरी हा भारताचा कणा आहे. चौधरी चरणसिंग अत्यंत साध्या मनाचे व अत्यंत साधे जीवन जगणारे शेतकरी नेते होते, ज्यांनी भारतीय शेतकऱ्यांचे जीवन सुधारण्यासाठी अनेक धोरणे आणली. ते शेतकरी कुटुंबातील होते आणि त्यामुळे भारताचे पंतप्रधान असूनही त्यांनी अतिशय साधे जीवन जगले. आपल्या जीवनातील शेतकऱ्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि त्याची कबुली देण्यासाठी 'राष्ट्रीय शेतकरी दिन' साजरा केला जातो. सर्वांना शेतकरी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

# युद्धाचे रूपांतर आता नव्या आणि घातक शस्त्रांच्या शर्यतीत

इस्रायल आणि लेबनॉनमध्ये युद्धबंदी झाली. मात्र ती काही तासच टिकली. अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी रशिया–युक्रेनमध्ये युद्ध होणार नाही, असे जाहीर केले; प्रत्यक्षात मात्र रशियाने युक्रेनवर मोठा हल्ला केला. दोन–तीन वर्षे असे युद्ध चालू राहते आणि त्याचे परिणाम जगाला भोगावे लागतात. आणखी किती काळ जगाने युद्धाच्या झळा सहन करायच्या, हा प्रश्नच आहे.



लेबनॉन आणि इस्रायलमध्ये दीर्घकाळ चाललेल्या तणावानंतर अखेर युद्धविराम झाला. लेबनीज सरकारने या कराराला मान्यता दिली आणि त्याला 'हिजबुल्लाह'सह सर्व लेबनीज गटांची संमती मिळाली. इस्रायलच्या मंत्रिमंडळानेही २६ नोव्हेंबर रोजी या युद्धविरामाला मंजुरी दिली आणि २७ नोव्हेंबर रोजी पहाटे ४ वाजल्यापासून दोन्ही देशांमधील संघर्ष थांबला; पण युद्धबंदीच्या २४ तासांमध्ये इस्रायल आणि लेबनॉनमधील तणाव पुन्हा वाढला. इस्रायलने २८ नोव्हेंबर रोजी दक्षिण लेबनॉनमध्ये 'हिजबुल्लाह'ने वापरलेल्या लाँचरवर हवाई हल्ला केला. इस्रायलकडून या हल्ल्यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. दक्षिण लेबनॉनच्या काही भागात परतण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांवर गोळीबार केल्याचे इस्रायली लष्कराने सांगितले. इस्रायलचे म्हणणे आहे की हे लोक युद्धविराम कराराचे उल्लंघन करत होते; २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता इस्रायल आणि लेबनॉनमध्ये युद्धविराम लागू झाला. यानंतर लेबनीज आर्मीवर अनेकदा युद्धविराम तोडल्याचा आरोप करण्यात आला. युद्धबंदी किती नाजूक आहे, हे या आरोप–प्रत्यारोपांवरून स्पष्ट होते. युद्धबंदीच्या अटींनुसार, इस्रायली सैन्याला दक्षिण लेबनॉनमधून माघार घेण्यासाठी साठ दिवस लागतील; परंतु या कालावधीत कोणतीही बाजू आक्रमक कारवाई करणार नाही. लेबनॉनमधून रॉकेट हल्ल्यांमुळे उत्तर इस्रायलमधील लोक विस्थापित झाल्यामुळे बेंजामिन नेतन्याहू यांनी 'हिजबुल्लाह'विरुद्ध ही कारवाई केली. तथापि, उत्तर इस्रायलमधील सुमारे साठ हजार लोक अजूनही आपल्या घरी परत येऊ शकलेले नाहीत. इस्रायलच्या म्हणण्यानुसार 'हिजबुल्लाह'ने कराराचे पालन केले तरच ते आपले सैन्य मागे घेतील. नेतन्याहू यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, आपण युद्धविरामाचे उल्लंघन केले, तर पुढील कारवाईसाठी तयार राहण्याचे आदेश दिले आहेत.

युद्धबंदीनंतर दोन्ही देशांमधील हिंसाचाराची पातळी लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. लेबनॉनने ऑक्टोबर २०२३ मध्ये हिंसाचार सुरू केला. हमासने गाझामधून हल्ला केल्यानंतर 'हिजबुल्लाह'ने इस्रायलवर रॉकेट, ड्रोन आणि मिसाईल डागण्यास सुरुवात केली. इस्रायलने हवाई हल्ले करून प्रत्युत्तर दिले आणि नंतर सप्टेंबरच्या मध्यात युद्ध मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. गाझामधील युद्ध अजूनही सुरू आहे आणि त्याचा शेवट दृष्टिपथात नाही. लेबनीज आरोग्य अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, इस्रायली गोळीबारात लेबनॉनमध्ये तीन हजार ७६०हून अधिक लोक मारले गेले. या लढाईमध्ये इस्रायलमधील सत्तरहून अधिक लोक मारले गेले. त्यापैकी अर्ध्याहून अधिक नागरिक होते, तसेच दक्षिण लेबनॉनमध्ये लढणारे डझनभर इस्रायली सैनिक होते. नेतन्याहू यांनी युद्धबंदीची तीन कारणे दिली आहेत. इराणवर लक्ष केंद्रित करणे, इस्रायली सैन्याला श्वास घेण्यास आणि साठा भरून काढण्यासाठी वेळ देणे आणि हमास–हिजबुल्लाहला वेगळे करणे. संयुक्त राष्ट्राने इस्रायलच्या हल्ल्यांना नरसंहार म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने इस्रायलला ताब्यात घेतलेल्या प्रदेशातून माघार घेण्याचे आवाहन केले आहे आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने नेतन्याहूविरुद्ध अटक वॉरंट जारी केले आहे; मात्र असे असतानाही इस्रायलने गाझामध्ये आपल्या कारवाया सुरूच ठेवल्या आहेत.

लेबनॉनसाठी ताज्या युद्धबंदीला मोठे महत्त्व होते. युद्ध सुरू होण्यापूर्वीच लेबनॉनची अर्थव्यवस्था खूपच कमकुवत होती. आता अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या संघर्षामुळे या देशाच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक संकटात आणखी वाढ झाली. शिवाय, युद्धाने लेबनॉनमध्ये सांप्रदायिक तणाव पुन्हा जागृत केला आहे. लेबनॉनमध्ये विविध गटांमध्ये तणाव, संघर्षाची परिस्थिती आहे. इस्रायलच्या हल्ल्यापूर्वी लेबनॉनमधील कोणताही गट 'हिजबुल्लाह'ला आव्हान देण्याच्या स्थितीत नव्हता; पण आता परिस्थिती बदलली आहे. 'हिजबुल्लाह'ची लष्करी शक्ती कमकुवत झाली असून त्याचा नेता नसराल्लाह मारला गेला आहे. लेबनॉनमध्ये दोन वर्षांपासून अध्यक्ष नाही. नवीन राष्ट्रपतींची नियुक्ती त्यांच्या मित्रपक्ष असण्याच्या अटीवर केली होती. आता लेबनॉनच्या नेत्यांनी नवीन अध्यक्षांच्या नावावर सहमती दर्शवली पाहिजे, जो नवीन पंतप्रधान आणि सरकार नियुक्त करेल.

दरम्यान, रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धाने नवे वळण घेतले. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी युक्रेनच्या मित्रराष्ट्रांना एक इशारा दिला आहे. यामुळे युरोपपासून इंग्लंडपर्यंत मोठ्या प्रमाणावर विनाश होऊ शकतो. हे देश पुतीन यांचे लक्ष्य आहेत. युक्रेनला आण्विक शस्त्रे परत करण्याचा निर्णय घेण्यात आला असताना पुतीन यांनी हा इशारा दिला आहे. या पावलामुळे जागतिक सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो, असा दावा रशियाने केला. युक्रेनला अण्वस्त्रे मिळाल्यास त्याचे प्रत्युत्तर अत्यंत विनाशकारी असेल, असे रशियाने स्पष्ट केले आहे. पुतीन यांच्या योजनेनुसार, लंडन, बर्लिन, पॅरिस आणि रोम यासारख्या युरोपियन राजधान्यांवर हल्ले केले जातील. स्वीडन, फिनलंड, पोलंड आणि नेदरलँड यांसारख्या देशांवरही भयंकर हल्ल्यांची योजना आखण्यात आली. पुतीन यांनी पारंपरिक अण्वस्त्रांच्या पलीकडे अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या शस्त्रांचा उल्लेख केला आहे, ज्यात हायपरसोनिक क्षेपणास्त्रे, गुप्त लढाऊ विमाने, लांब पल्ल्याचे ड्रोन, थर्मल रेडिएशन शस्त्रे यांचा समावेश आहे.

पुतीन यांचा इशारा हलक्यात घेतला जात नाही. हा इशारा युरोपच नव्हे, तर अमेरिका आणि इतर मित्र राष्ट्रांसाठीही गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. रशियाची ही आक्रमक भूमिका संपूर्ण जगाला विनाशाकडे ढकलू शकते. पुतीन यांच्या इशाऱ्यानंतर 'नाटो' देशांमध्ये घबराट पसरली आहे. अमेरिकेने युद्धक्षेत्रात 'मिनिटमॅन–३' क्षेपणास्त्र सक्रिय केले आहे. जर्मनी आणि पोलंडमध्ये संरक्षण यंत्रणा कार्यान्वित होत आहेत. अमेरिकेने आपली अण्वस्त्रे अपग्रेड करण्यासाठी १३८ अब्ज डॉलर (११ लाख कोटी रुपये) पेक्षा जास्त बजेट मंजूर केले आहे. अलीकडेच रशियाने युक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला करून त्या देशाचा वीजपुरवठा खंडित केला. या हल्ल्यांमध्ये रशियाने ९१ क्षेपणास्त्रे आणि ९७ ड्रोन्सचा वापर केला. युक्रेनच्या ऊर्जा क्षेत्राच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करणाऱ्या या हल्ल्यानंतर दहा लाखांहून अधिक लोकांना अंधारात राहणे भाग पडले. रशियाने या हल्ल्याचे वर्णन युक्रेनने अमेरिकन 'एटीएसीएमएस' क्षेपणास्त्रांच्या वापरास प्रत्युत्तर म्हणून केले आहे. ही बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे लांब पल्ल्याच्या हल्ल्यासाठी सक्षम आहेत. अलीकडेच युक्रेनने रशियन प्रदेशांवर हल्ला करण्यासाठी त्यांचा वापर केला होता. पुतीन यांनी या हल्ल्यांना 'पाश्चात्य शस्त्रांचा धोकादायक वापर' म्हटले आणि रशिया जोरदार प्रत्युत्तर देईल असे सांगितले.

हल्ल्यापूर्वी पुतीन यांनी कझाकस्तानची राजधानी अस्ताना येथे पत्रकार परिषदेत सांगितले, की रशिया युक्रेनच्या 'निर्णय केंद्रांवर' आणि कीव्हवर नवीन हायपरसॉनिक क्षेपणास्त्रांचा वापर करण्याचा विचार करू शकतो. रशियाने युक्रेनचे ऊर्जा ग्रीड आणि इंधन साठवण सुविधांवर हल्ला केल्यानंतर काही तासांमध्येच ही धमकी आली आहे. रशियन हल्ल्यांनंतर युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी 'नाटो'चे सरचिटणीस, ब्रिटिश पंतप्रधान स्टार्मर आणि जर्मन चान्सलर ओलाफ स्कोल्झ यांच्यासह अनेक पाश्चात्य नेत्यांना मदतीचे आवाहन केले. आमच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवर हा केवळ युक्रेनवरील हल्ला नाही तर संपूर्ण जगाच्या शांतता प्रयत्नांवर आहे. रशिया आणि युक्रेनमध्ये जवळपास तीन वर्षांपासून सुरू असलेल्या युद्धाचे रूपांतर आता नव्या आणि घातक शस्त्रांच्या शर्यतीत झाले आहे. युक्रेन पाश्चात्य शस्त्रांचा वापर करत असल्याचा दावा रशियाने केला आहे.

आरिफ शेख

# विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने अध्ययनाचे काम करावे : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन



मुंबई : मुंबईतील दादर येथील शारदाश्रम विद्यामंदिराचा ७५ वा वर्धापन दिन सोहळा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत आज झाला. विद्यार्थ्यांनी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी एकाग्रतेने अध्ययनाचे काम करावे, असे त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले. त्याचबरोबर कोणत्याही प्रकारच्या व्यसनांपासून विद्यार्थ्यांनी दूर राहावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

सायन येथील षन्मुखानंद सभागृहात आयोजित या सोहळ्यात सेवानिवृत्त मेजर जनरल नितीन गडकरी, शारदाश्रम विद्यालय शाळा ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. राजन गुप्ते, चेअरमन पी. बी. देसाई, सचिव गजेंद्र शेट्टी यांच्यासह माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी राज्यपाल म्हणाले, कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या प्रवासातील ७५ वर्षे हा मोठा टप्पा असतो. शारदाश्रम शाळेने या कालावधीत कौतुकास्पद काम केले आहे. दिलीप प्रभावळकर, भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्यासह या शाळेत शिकलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरीद्वारे शाळेचे नाव उंचावले आहे. या माजी विद्यार्थ्यांचा प्रवास प्रेरणादायी असून शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या कामाप्रमाणे आपल्या अभ्यासात एकाग्रतेची आणि कठोर परिश्रम करण्याची सवय अंगिकारावी, यश नक्की मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्यपाल म्हणाले, महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक थोर व्यक्तिमत्त्वांची भूमी आहे. शिवाजी महाराजांच्या आठवणी सांगून विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी अशा व्यक्तींच्या कार्यापासून प्रेरणा घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. विद्यार्थ्यांनी नेहमी सकारात्मक विचारसरणी ठेवावी तसेच शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी खेळांमध्ये अवश्य सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

श्री. गडकरी यांनी यावेळी बोलताना विद्यार्थ्यांना सेवादलाच्या माध्यमातून देशसेवेसाठी पुढे येण्यासाठी प्रेरणा दिली. तर संस्थेचे सचिव श्री. शेट्टी यांनी शारदाश्रमच्या वाटचालीबाबतची माहिती दिली.

शाळेतील दहावीच्या परीक्षेत तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच विद्यालयाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त काढण्यात आलेल्या अम्ब्रोसिया या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. शाळेच्या लहान विद्यार्थ्यांनी यावेळी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचेही राज्यपालांनी कौतुक केले.

# विठ्ठलपूजेचे बुकिंग १ जानेवारीपासून



सोलापूर : सावळ्या विठुरायाची पूजा करण्यासाठीची हजारो भाविकांची प्रतीक्षा आता संपली आहे. नवीन वर्षातील पहिल्या तीन महिन्यांसाठी येत्या १ जानेवारी रोजी श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या नित्य, तुळशीपूजा, नित्यपूजा आणि पाद्यपूजेसाठी ऑनलाइन बुकिंग सुरू केले जाणार आहे. भाविकांनी विठ्ठल– रुक्मिणी मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरच ऑनलाइन बुकिंग करावे, असे आवाहन मंदिर समितीकडून करण्यात आले आहे. पूजेची नोंदणी करण्यासाठी आतापासूनच भाविक सज्ज झाले आहेत.

श्री विठ्ठल आणि रुक्मिणीच्या नित्य, तुळशी आणि पाद्यपूजेमध्ये पारदर्शकता आणि सुसूत्रता यावी यासाठी मंदिर समितीने प्रथमच ऑनलाइन बुकिंग करण्याचा निर्णय घेतला आहे. तशी यंत्रणा देखील कार्यरत केली आहे. नव्या वर्षातील विठ्ठल आणि रुक्मिणी मातेच्या सर्व पूजांचे बुकिंग हे ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. या नव्या संगणकीय प्रणालीमुळे वशिलेबाजीला चाप बसणार आहे. त्यामुळे भाविकांमधून देखील मंदिर समितीच्या या नव्या निर्णयाचे स्वागत केले जात आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### तरुणीच्या पर्स मधून मोबाईल पळवला

सोलापूर, (प्रतिनिधी) : मधला मारुती सोलापूर ते कौतम चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत गर्दीमध्ये कुणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी शुभांगी किरण बलसुरे (वय-२५,रा. कुमारस्वामी नगर,शेळगी) यांच्या जवळील पर्समध्ये ठेवलेला बारा




हजार रुपये किम तीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे.ही घटना १ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या दरम्यान म धला मारुती येथे घडली. याप्रकरणी शुभांगी बलसुरे यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिवशरण हे करीत आहेत.

# शिंदे यांची खेळी यशस्वी? अजित दादांकडे तिजोरीच्या चाव्या पण..

## खाते वाटपात पुन्हा एकदा भाजपचाच वरचष्मा; नव्या मंत्र्यांना वजनदार खाती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : काल हिव-ाळी अधिवेशन समतात महायुती सरकारचे खातेवाटप जाहीर करण्यात आले या खाते वाटपात पुन्हा एकदा भाजपचाच वर चष्मा दिसला. अनेक दिग्गजना धक्का बसला तर काही नव्या मंत्र्यांना वजनदार खाती.



भाजपचाच विचार केला तर राधाकृष्ण विखे पाटील, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, यांना मोठा धक्का बसला आहे एक प्रकारचे हे नेत्यांची राजकीय वजन कमी करण्याचाच प्रयत्न या माध्यमातून झाल्याची चर्चा आता सुरू झाली आहे तर आता एकनाथ शिंदे यांच्या राजकीय खेळीचे ही चर्चा सुरू झाली आहे राज्याच्या तिजोरीच्या चाव्या जरी अजितदादांच्या हाती असल्या तरी खर्चाचे अधिकार मात्र शिंदेंनाच राहणार आहे असे चित्र आहे.

मंत्रिमंडळ विस्तारानंतर काल सायंकाळी खातेवाटप जाहीर करण्यात आले शिंदे यांच्या आमदारांना वजनदार खाते मिळाल्याची दिसत आहे. शिंदे यांनी ग्रह खात्याचा आग्रह सोडून दिल्यानंतर च्या वाटाघाटीत भाजी मारली आहे. सध्याच्या परिस्थितीत शिंदे गट फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात दुसऱ्या क्रमांकावर राहिला आहे.

याचे कारण म्हणजे अनेक महत्त्वाची खाती आपल्याकडे घेण्यात शिंदे यशस्वी ठरले आहेत. नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम, तसेच एम एम आर डी, सिडको एम एस आर डी चा ताबा शिंदे गटाकडेच राहणार आहे इतकेच नाही तर राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निधीही शिंदे यांच्याच हाती रा-हणार आहे. अर्थमंत्री म्हणून राज्याच्या तिजोरीच्या चाव्या जरी अजित दादाकडे राहणार असल्या तरी खर्चाची अधिकार शिंदे यांच्याकडे राहणार आहेत खाते वाटपाच्या वेळी शिंदेनी गृह खात्यासाठी जोर लावला होता त्यामुळे त्यांनाही मुख्यमंत्रीपद मिळाले नाही तरी किमान ग्रहाने विभाग तरी मिळावा, अशी शिंदे यांचा आग्रह होता यासाठी शिंदे कडून फडणवीस उपमुख्यमंत्री असताना ग्रह खाते त्यांच्याकडे होते, असा तर कधी ला जात होता मात्र भाजपने कोणत्याही परिस्थितीत गृह विभाग सोडण्यास नकार दिला, ग्रह खाते मिळणार नाही म्हटल्यानंतर शिंदेंनी दबाव तंत्राचा वापर करत गृहनिर्माण सारखे वजनदार खाते पदरात पाडून घेतली आहेत.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी केली ध्यानाची साधना

## जिमखाना विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय ध्यान दिवसानिमित्त कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मात-ोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी म हाविद्यालयातील महिला कक्ष विभाग व जिमखाना विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय ध्यान दिवसानिमित्त विद्यार्थ्यांनी ध्यान साधना करून एकाग्रता वाढावी यासाठी प्रयत्न केले.



कल्याणशेट्टी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय ध्यान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ध्यान साधना करताना विद्यार्थी.

विद्यार्थ्यांच्या जीवनात गुणवत्ता महत्त्वाची असते, विद्यार्थ्यांचा बुद्ध्यांक सुधारण्यासाठी नियमित ध्यान साधना आवश्यक असते. ध्यानामुळे विचारांवर नियंत्रण मिळवता येते. आत्मविश्वास निर्माण होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना आत्मसन्मान मिळतो. असे यावेळी प्राध्यापिका मधुबाला लोणारी यांनी सांगितले.

ध्यान साधना केल्याने व एकाग्र बुद्धीने नव नवीन शोध लावता येतो. यासाठीच विद्यार्थी दशेतच आपला आत्मविश्वास व व्यक्तिमत्व घडत असते. म्हणूनच विद्यार्थ्यांनी नियमितपणे ध्यानसाधना करावी असे यावेळी प्राध्यापिका डॉ.शितल झिंगाडे यांनी सांगितले.

कार्यक्रमास प्रा.मनीषा शिंदे, प्रा.प्राची गणाचारी, प्रा.जनाबाई चौधरी, प्रा.विद्या बिराजदार, प्रा.शिल्पा धुमशेट्टी, प्रा.विद्याश्री वाले व प्रा.भीम सोनकांबळे तसेच विठ्ठल यरगल महेश जोगदे उप-स्थित होते.

या उपक्रमाचे संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, जूनियर विभाग प्रमुख पुनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा यांनी विशेष कौतुक केले.

# श्री विठ्ठल कारखान्याचा काट्याची भरारी पथकाकडून तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : वैद्यम ापन विभागाच्या भरारी पथक तपासणी काटा कुठूनही करून आणा चेअरमन अभिजीत पाटील यांनी केलेली आव्हान खरे ठरले. वेणू नगर दि १८ पंढरपूर तालुक्याच्या आर्थिक कणा असणाऱ्या श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर दिनांक १०/१२/२०२४ रोजी वैद्यमापन विभागाचे अचानक भरारी पथक आलै. व त्यांनी केलेल्या तपासणी बदकास कारखान्याचे सर्वच वजन काटे बरोबर असल्याचे आढळून आले. त्यामुळे वजनात कोणताही गैरप्रकार नसल्याचे भरारी पथक व वैद्यमान अधिकाऱ्याकडून शिका मुहूर्त करण्यात आला.

कारखान्याचे चेअरमन आमदार श्री अभिजीत पाटील यांनी सतत आपल्या भाषणातून शेतकऱ्यांना विश्वास देत होते की, काटा कुठूनही करून या आमचा काटा चोख असणार आहे. वर्धम ान पथकाने अचानक भेट देऊन यावर शिकामोर्तब केला आहे. आमदार श्री अभिजीत पाटील हे सतत सांगत आहेत की भागातील शेतकरी सुजलाम सुफलाम झाला पाहिजे उन्नती होऊन शेतकऱ्यांना ज्यादा पैसे मिळावे याकरिता कारखान्याचे संचालक मंडळ प्रयत्न करीत आहेत.

वैद्यमापन विभागाच्या तपासण्यातील कारखान्याच्या काठावर कोणत्याही गैरप्रकार अथवा वजनात तफावत नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे वैद्यमान विभागाच्या भरारी पथकाने देखील कारखान्याच्या प्रशासनाचे कौतुक केले.




काटा कुठूनही करून या असे चेअरमन व संचालक मंडळी जाहीर केल्याने श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना हा शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून काम करीत आहे नेहमी शेतकऱ्यांच्या विश्वास-ाला जपत असल्याने चालू गाळप हंगाम यशस्वी करू असे कारखान्याचे कार्यकारी संचालक आर बी पाटील यांनी सांगितले. वर्धमान तपासणी पथकाने उपनियंत्रक वैद्यमान शास्त्र पुणे श्री सतीश अभंग, सहाय्यक नियंत्रक वैद्यमान शास्त्र इंदापूर विभागाचे श्री अंकुश इंगोले, निरीक्षक वैद्यमान शास्त्र पुणे श्री टिके पाटील, निरीक्षक वैद्यमान शास्त्र खेळ विभाग श्री प्रदीप बागडे, यांच्यासह शेतकरी वाहन मालक उप-स्थित होते तसेच तपासणी-वेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक जनरल मॅनेजर वर्क्स मॅनेजर व केनवर्ड सुपरवायझर उपस्थित होते.

# सहकारी शिरोमणी कारखान्यावर प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका भाळवणी येथील सहकार चोरमणी वचरण नाव काळे सहकारी साखर कारखान्यावर प्रादेशिक परिवहन अधिकारी सोलापूर यांचे भरारी पटकन भेट देऊन त्यांनी कारखान्याचे ऊस वाहतूक करणारे बैलगाडी बजेट या ट्रक ट्रॅक्टर/बजेट यांना कोणताही अपघात होऊ नये म्हणून वाहतूकदार ड्रायव्हर यांना मार्गदर्शन केले.

मार्गदर्शनाखाली ऊस तोंडी वाहतूक करणारे बैलगाडी, ट्रॅक्टर, बजेट यंत्रण सुरक्षेच्या दृष्टीने कारखान्याने रिपेक्टर/रेडियम/रिफेक्ट बसवण्याची व्यवस्था केली असून सदर कमी कारखाना साइटवर आलेली प्रादेशिक परिवहन अधिकारी पांढरे यांचा सत्कार कारखान्याची व्हाईस चेअरमन भारत कोळेकर यांनी केला तसेच असिस्टंट प्रादेशिक परिवहन अधिकारी सलगर यांचा सत्कार सभासद नारायण शिंदे यांनी केला आणि अश्विनी पाटील यांनी असिस्टंट प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा इतर स्टाफ व सत्कार करण्याच्या वतीने करण्यात आला.

यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी पाटील यांनी ऊस वाहतूक करणारी ट्रॅक्टर यांना वाहनाच्या पुढील व मागील बाजूस कापडी मेजेक्टर बसवण्यात यावी तसेच रेडियम पट्टी मागील येणाऱ्या वाहनास दिसेल अशा ठिकाणी लावावी जेणेकरून अपघात टाळता येईल अशी माहिती सर्व ड्रायव्हरला देण्यात आली त्याच्या सूचनाचे पालन करून कारखान्याकडे असलेल्या वाहनांना रिपेक्टर बसवण्यात आले आहे.

यावेळी कारखान्याचे प्रभारी कार्यकारी अधिकारी संचालक पीडी घोंगरे, डेप्युटी जनरल मॅनेजर के आर कदम, शेती अधिकारी प्रतापराव थोरात, परचेस अधिकारी सीजी कुंभार सर्व ग्री ओव्हर्स नियर किनार सुपरवायझर डीडी काळे, करेन अधीक्षक कुंभार सुरक्षा अधिकारी मनसुख सय्यद व कर्मचारी ड्रायव्हर उपस्थित होते.



# बोळेगाव येथे इंडियन आर्मी सैनिकाचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (प्रतिनिधी): तुळजापूर तालुक्यातील मौजे बोधळगाव येथील इंडियन आर्मी मध्ये नुकतेच भरती झालेले जवान अविनाश आत्माराम सुर्यवंशी यांचा ग्राम स्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

अविनाश सुर्यवंशी यांनी देशाची प्रमाणिक पणे सेवा करण्यासाठी अथक परिश्रम घेवून इंडियन आर्मी दलात भरती होऊन नुकतेच आर्मी ची ट्रेनिंग पूर्ण करून गावी बोळेगाव येथे काही दिवसांच्या सुट्टीवर आले असता ग्रामस्थांच्या वतीने येथील सरपंच विलास पाटील व सामाजिक कार्यकर्ते सतिश सुर्यवंशी यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी ग्रा.प.सदस्य अंकुश रुपनूर, सुनील सुर्यवंशी, पोलिस पाटील कडाजी सुर्यवंशी, सहशिक्षक आप्प-ाजी सुर्यवंशी,नागरबाई जाधव सामाजिक कार्यकर्त्या संगिता सुर्यवंशी सह महिला, युवक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मतदार संघातील रस्त्यांच्या कामासाठी आ. अभिजीत पाटील यांचे केंद्रीय मंत्र्यांकडे साकडे

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा सकारात्मक प्रतिसाद

# आमदार अभिजीत पाटील यांच्या प्रयत्नाने मतदार संघातील रस्ते होणार चकाचक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माढा/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी केंद्रीय रस्ते महामार्ग वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची नागपूर येथे भेट घेऊन मतदार संघातील विविध रस्त्यांच्या कामाबाबत निवेदन देऊन संबंधित कामे मार्गी लावण्याची विनंती केली. यावेळी आमदार पाटील यांनी महाराष्ट्राचा आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठलाची मूर्ती देऊन गडकरी यांचे स्वागत केल.

याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलेल्या मागण्यांबाबत सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन मतदारसंघातील रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी केली मागणी**

माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी निवडणुकीदरम्यान मतदार संघातील नागरिकांना मतदारसंघातील रस्ते चकाचक करण्याचे आश्वासन दिले होते. मतदार संघातील रस्ते पूर्ण व्हावेत यासाठी त्यांनी केंद्रीय रस्ते महामार्ग वाह-तूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन माढा मतदारसंघातून जाणारा श्री संत मुक्ताई पालखी महामार्गाला राज्य महामार्ग दर्जा देऊन निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. माढा मतदारसंघातून करमाळा- टेंभुर्णी- पंढरपूर- मंगळवेढा रस्ता चौपदरी करावा. पंढरपूर (तिर्हेमार्ग) देगाव- सुस्ते- टाकळी सिकंदर- कुरुल रस्ता चौपदरी करावा. याचबरोबर मतदारसंघातील अनेक रस्त्यांच्या कामाबाबत निवेदन देऊन लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली आहे.

यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलेल्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्याने आमदार अभिजीत पाटील यांच्या प्रयत्नांमुळे मतदार संघातील रस्ते चकाचक होणार आहेत.







# सिंदखेड राजा येथे एन.एम.एम.एस परीक्षेत सावळा गोंधळ

## शिक्षकांनी काही विद्यार्थ्यांना केले सहकार्य, विद्यार्थ्यांचा आरोप; सखोल चौकशी करून दोषीवर योग्य ती कारवाई करा : पालकवर्गाची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

सिंदखेडराजा तालुक्यातील पुर्व माध्यमिक शाळेतील वर्ग ८ मधील विद्यार्थ्यांची एन एम एम एस ( आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा ) आज सिंदखेडराजा येथे घेण्यात आली . या परीक्षेत सावळा गोंधळ उडाला असून थेट काही विद्यार्थ्यांना शिक्षकांनी सहकार्य केल्याचा आरोप परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी केला आहे . परीक्षा सुरु असताना एकाही खोलीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नव्हते.

सिंदखेडराजा तालुक्यातील पुर्व माध्यमिक व माध्यमिक शाळेतील वर्ग ८ मधील १०५ गावातील विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी सिंदखेडराजा येथील जिजामाता विद्यालयात गेले होते . सकाळी १०:३० वाजता पहिला आणि १:३० वाजता दुसरा पेपर होता . पहिल्या पेपरसाठी विद्यार्थी प्रवेश खोलीमध्ये गेले असता, त्यांना ११ ते ११:३० वाजता पेपर देण्यात आला. पेपर सुरू असताना वर्गावरील पर्यवेक्षक शिक्षक



म्हणून जिजामाता विद्यालयातील शिक्षकांची नियुक्ती केली होती . हे पर्यवेक्षक शिक्षक त्यांच्याच शाळेतील विद्यार्थ्यांना पेपर सोडवताना मार्गदर्शन करीत होते . त्यामुळे इतर विद्यार्थी गोंधळात पडले . नेमका हा काय प्रकार सुरु आहे . १२:३० वाजता पेपर संपल्यानंतर ही बाब तालुक्यातील इतर विद्यार्थ्यांनी पालक व शिक्षक यांना सांगितला . महाराष्ट्र राज्य पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष तेजराव देशमुख यांनी तत्काळ याची दखल घेऊन गटविकास अधिकारी भास्कर वाघमारे यांचेकडे मोबाईल फोन द्वारे केली . याची तत्काळ दखल घेण्याऐवजी वाघमारे यांनी टी के देशमुख यांनाच दमदाटी करीत बदनामी करीत असाल तर याद राखा असे सुनावले.

सिंदखेडराजा तालुक्यात परीक्षेत अनागोंदी कारभार सुरू असताना वरीष्ठ अधिकारी मुक भुमिका घेत असेल तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही . शासनाचे परीक्षा काळात प्रत्येक परीक्षा सेंन्टरवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश दिले असताना सिंदखेडराजा येथील जिजामाता विद्यालयात मात्र एकही सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आला नव्हता . त्यामुळे हा पुर्वनियोजीत प्लॅन असल्याचा आरोप अनेक पालकांनी केला आहे . या परीक्षा सेंन्टरची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी संतप्त पालक आणि विद्यार्थ्यांनी केली आहे.

**परीक्षा सुरु असताना इतर शिक्षकांना प्रवेश नाकारण्यात आला, परीक्षा सुरु असताना कोणताही चिटींगचा प्रकार झाला नाही. मी स्वत: हा परीक्षा केंद्रावर भेट दिली. सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले की नाही याची मला कल्पना नाही.**

**– भास्कर वाघमारे**
**गटशिक्षणाधिकारी , सिंदखेडराजा**

**एन एम एम एस परीक्षा सुरु असताना आतील सावळा गोंधळ याची माहिती विद्यार्थ्यांनी आम्हाला दिली असता मी लागलीच गटशिक्षणाधिकारी यांना माहिती दिली. त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. आणि दुसरा पेपर सुरू असताना भेट देऊन निघुन गेले.**

**– तेजराव देशमुख,**
**पदविधर प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष**

**आमच्या वर्गातील टीचरने काही विद्यार्थ्यांना पेपरवर आळे करून दिले. आणि पेपर सोडविताना त्यांना उत्तर सांगितले.**

**– कृष्णा गजानन फड (विद्यार्थी)**
**वसंतराव नाईक विद्यालय, शेंदुर्जन**

## थोडक्यात...

### किरकोळ कारणावरून तरुणास मारहाण; दोघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : किरकोळ कारणावरून तरुणास मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध एम आयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना २० डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास साद कटिंग नई जिंदगी येथे घडली. याप्रकरणी उमर मौलाली बिराजदार (वय-२०,रा.कस्तुरबा नगर) यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून मोहसिन शेख व अमन इरफान नाईकवाडी (दोघे. रा.नई जिंदगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अमन नाईकवाडी याने महबूब सुभानी दर्गा विजापूर रोड सोलापूर येथे दारू पिऊन चार ते पाच दिवसांपूर्वी विनाकारण वाद घातला होता. त्याच कारणावरून चिडून जाऊन सात कटींग नही जिंदगी सोलापूर येथे २० डिसेंबर रोजी फिर्यादी उमर बिराजदार यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर मोहसिन शेख याने लाकडाने डोक्यात पाठीत मारून फिर्यादीला दुखापत करून दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पवार हे करीत आहे.

# कर्मचारी अधिकारी यांचा अनुशेष भरून बिंदू नामावली सह प्रवर्गातील आरक्षण भरा

## रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशनचे केंद्रीय सरचिटणीस आत्माराम पाखरे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चिखली तालुका प्रतिनिधी / कैलास आंधळे

राज्यातील कामगार कर्मचारी व अधिकारी यांचा अनुशेष त्वरित भरून काढावा व बिंदू नामावलीनुसार निर्देशित केलेल्या त्या त्या प्रवर्गातील धोरण विहित केलेल्या आरक्षण टक्केवारीचा अवलंब करण्यात यावे अशी मागणी रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशन चे केंद्रीय सरचिटणीस आत्माराम पाखरे मुंबई यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे . कामगार कर्मचारी अधिकारी यांचे जे सर्वांगीण प्रश्न प्रलंबित आहेत त्या प्रश्नांची नक्कीच कालबद्ध सोडवणूक कराल अशी आग्रहाची विनंती राज्यामध्ये सरळ सेवा भरती विविध खात्यामध्ये बरेच कालावधीपासून झाले नसल्यामुळे अनुशेष वाढतच आहे त्यामुळे त्या कर्मचारी वर्गावर कामाचा भार वाढत असून वेळेवर जनतेची कामे पूर्ण होत नाहीत गतिमान प्रशासन व सकारात्मक पवित्रता देणारी कार्यशैली त वाढ करण्यासाठी प्रत्येक विभागात पुरेसा कर्मचारी वर्ग आवश्यक आहे त्यामुळे शासनाने घेतलेले निर्णय कार्यान्वित होण्यासाठी नक्कीच मदत होईल अनुशेष भरताना शासनाच्या प्रत्येकी भागाने बिंदू नामावली अद्यावत करणे आवश्यक आहे तरच त्या विभागात कोणत्या प्रवर्गाचा किती अनुशेष आहे हे बिंदू नामावली रजिस्टर करून स्पष्ट होईल कारण बिंदू नामावली पद्धतीने विहित केलेल्या आरक्षण टक्केवारी प्रवर्गनिहाय स्पष्ट होते व तेव्हाच लवकर भरतीची वर्तमानपत्रात प्रसिद्धी देताना प्रवर्ग विषय आकडेवारी देणे सुरू होते तरी कृपया बिंदू नामावली अद्यावत करण्याच्या सूचना प्रत्येक विभागात देण्यात यावात अशी विनंती आहे पदोन्नती मधील आरक्षण हे न्यायालयाच्या निर्देशांचा चुकीचा अर्थ काढून २०१७ पासून मागासवर्गीयांचे त्यांचे हक्काचे पदोन्नतीतील आरक्षण बंद केले आहे त्यांचे पूर्ण अवलोकन करून पूर्ववत चालू करण्यात यावे शासनाच्या या एकत्रित निर्णयामुळे हजारो मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यामुळे त्यांच्यात असंतोष आहे की ते कर्मचारी या २०१८ ते २०२४ पर्यंतच्या काळात विना पदोन्नती सेवा नियुक्त झाले आहेत पदोन्नती देताना सेवा जेष्ठता लक्षात घेऊनच क्रमवारी दाखवून पदोन्नती देण्यात संयुक्तिक व न्याय आहे . शासकीय निधीची वाटप मागासवर्गीयांच्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन शासनाने जुनी जी निर्धारित केलेला आहे त्याचे वाटप करून तो त्यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी वापरावा अन्य इतर खात्याकडे होऊ नये कारण जनमानसात याविषयी असंतोष आहे तसेच मागासवर्गीयांना आवश्यक सुविधा पासून वंचित राहावे लागते बार्टीच्या माध्यमातून ज्या सोयी सुविधा मागासवर्गीयांच्या उत्थानासाठी राबविला जात होत्या त्यामध्ये घट होताना दिसत आहे त्या सर्व सोयी सुविधा पूर्ववत चालू कराव्यात अशी कळकळीची विनंती आहे प्रत्येक विभागात आवश्यकतेनुसार समुपदेशक यांची नेमणूक खास करून शिक्षण विभागामार्फत शाळा महाविद्यालय मध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांना समुपदेशित करणे आवश्यक आहे जुनी पेन्शन योजना लागू करावी व सेवानिवृत्ती वय ६० करावे आरक्षण बाह्य धोरण अवलंबून उच्चपदी अधिकाऱ्यांची सरळ सेवा भरती करून मागासवर्गीय डावलले आहे परिणामी त्यांचे प्रतिनिधित्व उच्च पदी नाही कृपया सर्व बाबींचा गांभीर्यपूर्वक विचार करून सकृतदर्शनी कारवाई करण्याचे



आदेश द्यावेत.

ही विनंती १९९७ मध्ये घटनादुरुस्ती वरून पदोन्नतीमध्ये आरक्षण दिले होते केंद्र सरकारच्या डीओपीटी विभागाने २०२१ रोजी पत्र काढून राज्य शासन पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊ शकते असे सुद्धा राज्यांना आदेश दिले होते असे असताना महाराष्ट्र शासनाने २०१७ पासून पदोन्नती आरक्षण बंद केले आहे ते चालू करून पूर्ण करावे अशी मागणी रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशन चे केंद्रीय सरचिटणीस आत्माराम पाखरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देवून मागणी केली आहे

# अज्ञात चोरट्याने दुचाकी पळवली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली फिर्यादी यल्लप्पा ज्ञानेश्वर घाडगे (वय-४२,रा.महालक्ष्मी चौक,जुना विडी घरकुल) यांची दुचाकी क्रमांक एमएच.१३. सीआर.००४२ हे अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. हि घटना १९ ते २० डिसेंबर दरम्यान महालक्ष्मी चौक येथे घडली. याप्रकरणी घाडगे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भांगे हे करीत आहेत.

# प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांची निलेश सोमाणी यांच्या निवासस्थानी सांत्वना भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अमरावती/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भ प्रमुख निलेश सोमाणी यांच्या मातोश्री स्नेहलता सोमाणी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शनिवारी सोमाणी सदन, उजांबावाडी अंबापेठ, राजकमल चौक येथील निवासस्थानी भेट देऊन सोमाणी परिवाराचे सात्वन केले.

यावेळी निलेश सोमाणी, राजेश सोमाणी, श्याम सोमाणी, वडील पूनमचद सोमाणी,मोठे वडील प्रेमचंद सोमाणी, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पश्चिम विदर्भाध्यक्ष नयन मोंढे, जिल्हाध्यक्ष प्रवीण शेगोकार माजी जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड शुभम मेश्राम जीरापुरे यांच्यासह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

**कर्मचारी व शेतकरी यांच्या मांडणार व्यथा**

**माजी आमदार राम सातपुते यांची भेट घेणार**

# साखर संचालक डॉ. संजयकुमार भोसले यांच्या पत्राला शंकर साखर आणि चेअरमन व कार्यकारी संचालकांनी दाखवली केराची टोपली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतीय जनता युवा मोर्चाची राष्ट्रीय उपाध्यक्ष माळशिरस विधानसभेचे लोकप्रिय दमदार माजी आमदार राम सातपुते यांना भेटून थकीत पगार बाबत कर्मचारी व शेतकरी यांच्या व्यथा मांडणार आहेत.

साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य साखर संकुल यांच्याकडून श्री शंकर सहकारी साखर कारखाना सदाशिवनगर अध्यक्ष कार्यकारी संचालक यांना साखर संचालक प्रशासन डॉक्टर संजय कुमार भोसले यांच्याकडून पत्र आले आहे यामध्ये कामगारांचा थकीत पगार ज्योती हा विषय संबंधित कारखाना स्तरावरील आहे. थकीत वेतन मग ग्रॅज्युटी व वाढीव फरक आणि उत्पादन मिळण्याबाबत श्री सहकारी शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड सदाशिवनगर नेमानुसार अदा



करण्यात योग्य ती कारवाई करून अहवाल कार्यालयात सादर करण्यास यावा असे दिनांक पत्र ०८/११/२०२३ रोजी दिलेले होते साखर संचालक प्रशासन डॉक्टर संजय कुमार भोसले यांच्या पत्राला श्री शंकर सहकारी साखर कारखान्याची चेअरमन व कार्यकारी संचालकांनी खेळाची टोपली दाखवलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याची मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची शिवशंकर सहकारी साखर कारखान्याच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे शिष्टमंडळ भेट घेणार आहे. व भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व माळशिरस विधानसभेचे लोकप्रिय माजी आमदार राम सातपुते यांनी भेट घेऊन थकीत कर्मचारी व शेतकरी व्यथा मांडणार असल्याचे कामगारांमधून बोलले जात आहे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी श्री शंकर सहकारी साखर कारखाने या थकीत कामगार शेतकऱ्यांची देणे देणे करता ११३ कोटी रुपये मंजूर केलेली होती मात्र कारखान्याची चेअरमन भारतीय जनता पक्षाचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील आहेत. भाजपच्या विचार मंचाची सहकार असल्याने सहकार मंत्री व साखर आयुक्त यांची दिशाभूल करण्यात धक्कादायक प्रकार केलेल्या असल्याने संतप्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमधून बोलले जात आहे.



# केकतउमरा येथे संत गाडगेबाबा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त समाज प्रबोधन कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशिम/प्रतिनीधी : वाशिम इथून जवळच असलेले केकतउमरा येथे नेहरू मंडळ बहुउद्देशिय व राजा प्रसेनजित अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबसाहेब अंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन ६ डिसेंबर व २० डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त समाजप्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भीमज्योत गायन पार्टीच्या कलाकारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरआणि राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या जीवन चरित्रावरती गीत गायनातून समाजप्रबोधन करित अंधश्रद्धा निर्मुलन ,शिक्षण,आरोग्य,स्वच्छता, महिला सक्षमीकरण, अशा विविध विषयांवर प्रबोधन केले. या कार्यक्रमाची सुरुवात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिनिधीचे पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित राजा प्रसेनजित अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष प्रविण पट्टेबहादुर, भीमज्योत गायन पार्टीचे अध्यक्ष शाहिर प्रभू पट्टेबहादुर, सचिव अनंता पट्टेबहादूर, नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ अध्यक्ष जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त प्रदिप पट्टेबहादूर, कलाकार शाहिर अशोक पट्टेबहादुर, दादाराव पट्टेबहादुर, मनोहर पट्टेबहादूर, मोहन पट्टेबहादुर, नेहरू युवा मंडळ सदस्य दिपक पट्टेबहादुर, संदिप कांबळे, पवन हरिमकर, यांची उपस्थिती नाकात तुम्हाला गावातील नागरिकांनची मोठा जनसमुदाय उपस्थित होता. या कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता नेहरू युवा बहुउद्देश्य मंडळ व राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था प्रतिनिधी यांनी मोठे परिश्रम घेतले.

**नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ व भीमज्योत गायन पार्टी यांच्या पुढाकर**